**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : २९/०७/२०२५

**पोस्टे नांदेड ग्रामिण येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार ज्ञानेश्वर तिडके यांनी अर्जावर कारवाई करण्याचा मोबदला म्हणुन १२,०००/—रूपयांची लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
|---|---|
| पोलीस ठाणे | नांदेड ग्रामिण |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं ७१९/२०२५ कलम ७,७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २८/०७/२०२६ रोजी २१.५४ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | ज्ञानेश्वर भिमराव तिडके, पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.नं. ११२६, तत्कालीन नेम. पो.स्टे. नांदेड ग्रामीण, ता. जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | —— |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी फायनान्सकडून ट्रॅक्टर घेतला होता. तो ट्रॅक्टर एजन्सी चे मालक यांनी तक्रारदाराचे संमती शिवाय ओढून नेला म्हणून चोरीचा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाला अर्ज दिला होता. सदर अर्ज चौकशी करीता नांदेड ग्रामीण पो स्टे येथे पोहेकॉ/ तिडके यांचेकडे होता.<br>त्या अर्जावर कारवाई करण्यासाठी तक्रारदार हे पोलीस कर्मचारी तिडके यांना भेटले. तेव्हा पोलीस कर्मचारी तिडके यांनी "पैसे देवून साहेबांना भेटाव लागते, तरच कारवाई होते. नाही तर असेच अर्ज पडून राहतात" असे म्हणून अर्जदार यांच्याकडे ठाणेदारांना सांगून फिर्याद दाखल करण्यासाठी १२,०००/— रूपयांची मागणी केली.<br>दिनांक ०७/०५/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक तिडके यांनी तक्रारदार यांच्या अर्जातील गैरअर्जदार व्यक्तीवर चोरीचा गुन्हा दाखल करून एफआयआर ची प्रत देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे एक लाख रूपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>एकंदरित सर्व कार्यवाहीमध्ये दि. ०७/०५/२०२५ रोजी लोकसेवक तिडके यांनी तक्रारदार यांच्या तक्रारी अर्जावर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्याकरीता लाचेची मागणी केल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर सदरील लाच प्रकरणातील तक्रादार यांचा शोध घेतला, परंतु ते मिळून आले नाही व त्यांचा फोन देखील बंद होता.त्यामुळे नमूद लाच मागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये सापळा अधिकारी पोनि माधुरी यावलीकर यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवून आज रोजी लोकसेवक ज्ञानेश्वर भिमराव तिडके यांचेविरूध्द पो.स्टे. नांदेड ग्रामीण, ता.जि. नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्‌दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फी कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |


पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग,नांदेड युनिट